
G61/BPS201/EE/20160518

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



उत्तराची अयोग्य नोंद



उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. SY BA साठी उणे पद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 40)

या विभागात एकूण 80 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 40 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. पुढीलपैकी कुठे हडप्पा संस्कृती आढळत नाही ?
   a) लोथल b) रुपार
   c) कालीबंगन d) अहमदाबाद

2. पुढीलपैकी कशाचा सिंधु संस्कृतीच्या मुख्य व्यवसायांमध्ये समावेश होत नाही ?
   a) लोहारकाम b) शेती
   c) व्यापार d) कुंभारकाम

3. 'बुद्धचरित' हा ग्रंथ कोणी लिहिला ?
   a) अश्वघोष b) बाणाभट्ट
   c) नागार्जुन d) वज्रसेन

4. बौद्ध धर्मामध्ये कोणते त्रिपिटकांमध्ये धरले जात नाही ?
   a) विनय पिटक b) सुत्त पिटक
   c) धम्म पिटक d) अभिधम्म

5. चंद्रगुप्त मौर्याचा पंतप्रधान कोण होता ?
   a) चाणक्य b) हरिसेन
   c) हेमाद्री d) नागसेन

6. इ.स. 1724 साली दक्षिणचा सुभेदार म्हणून कोणाची नियुक्ती केली ? त्याने हैद्राबादची स्थापना केली.
   a) फरुखशियर
   b) मीर कासीम
   c) निजाम उल् मुल्क
   d) निजाम अल हसन

7. पुढीलपैकी कोण पेशवा नव्हता ?
   a) बाळाजी विश्वनाथ
   b) सवाई माधवराव
   c) विश्वासराव
   d) नारायणराव

8. 1497 मध्ये वास्को-द-गामा याचे भारतात पहिल्यांदा कोठे आगमन झाले ?
   a) गोवा b) सुरत
   c) कालिकत d) कोचीन

9. स्थानिक राजकारणात लक्ष घालून इंग्रजांना शह देण्याची योजना कोणी आखली ?
   a) रॉबर्ट क्लाईव्ह b) वॉरन हेस्टिंग
   c) जनरल डुप्ले d) जनरल डायर

10. गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिकने कोणत्या सुधारणा केल्या ?
    a) राज्यकारभारातील अनावश्यक पदे रद्द केली.
    b) कंपनीच्या नोकरांचे पगार कमी करण्यात आले.
    c) भारताला स्वातंत्र्य देण्याचे घोषित केले.
    d) सती प्रथा बंदी कायदा आणला.

11. खालीलपैकी कोणत्या गव्हर्नर जनरलने संस्थाने खालसा करण्याचे धोरण कठोरपणे राबवले ?
    a) लॉर्ड मेयो
    b) लॉर्ड रिपन
    c) लॉर्ड डलहौसी
    d) लॉर्ड कॅनिंग

12. खालील घटनांचा कालानुक्रम ओळखा.
    a) इल्बर्ट बिल, पहिला फॅक्टरी ॲक्ट, हंटर कमिशन, स्थानिक स्वराज्य संस्था कायदा
    b) पहिला फॅक्टरी ॲक्ट, हंटर कमिशन, स्थानिक स्वराज्य संस्था कायदा, इल्बर्ट बिल
    c) हंटर कमिशन, स्थानिक स्वराज्य संस्था कायदा, इल्बर्ट बिल, पहिला फॅक्टरी ॲक्ट
    d) स्थानिक स्वराज्य संस्था कायदा, हंटर कमिशन, पहिला फॅक्टरी ॲक्ट, इल्बर्ट बिल

13. भारताचा पहिला व्हाईसरॉय कोण होता ?
    a) लॉर्ड डलहौसी
    b) लॉर्ड बेंटिक
    c) लॉर्ड कॅनिंग
    d) लॉर्ड कॉर्नवॉलिस

14. भारतीय सिव्हील सर्व्हिसेसची सुरूवात कधीपासून झाली ?
    a) 1853 b) 1800
    c) 1805 d) 1829

15. वुडस् डिस्पॅच (वुडचा खलिता) कशाशी संबंधित होता ?
    a) भारतीय मुलकी व्यवस्था
    b) भारतातील घटनात्मक सुधारणा
    c) भारतीय शिक्षण व्यवस्था
    d) भारतीय समाजात करावयाच्या समाजसुधारणा

16. लॉर्ड मेकॉलेने त्याच्या प्रसिद्ध टिपणात (मेकॉलेज मिनिट्स) भारतात कोणत्या शिक्षणपद्धतीचा प्रसार करावा असे मत मांडले ?
    a) पाश्चात्य शिक्षणपद्धती
    b) पौर्वात्य शिक्षणपद्धती
    c) पाश्चात्य व पौर्वात्य शिक्षणपद्धतीचे मिश्रण
    d) प्राचीन गुरूकूल शिक्षणपद्धती

17. 1857 मध्ये भारतात विद्यापीठांची स्थापना सर्वप्रथम कोठे करण्यात आली ?
a) दिल्ली, मुंबई, कोलकाता
b) मुंबई, अलाहाबाद, कोलकाता
c) मुंबई, वाराणसी, मद्रास
d) कोलकाता, मुंबई, मद्रास

18. 'यंग बंगाल' चळवळ कोणी सुरू केली होती ?
a) राजा राममोहन रॉय
b) केशवचंद्र सेन
c) रवींद्रनाथ टागोर
d) हेन्री डिरेझियो

19. कायमधारा पद्धत सर्वप्रथम कोणत्या प्रांतात लागू करण्यात आली ?
a) बंगाल b) संयुक्त प्रांत
c) मध्य प्रांत d) मद्रास प्रांत

20. पुढीलपैकी डाक तिकिटे कोणी सुरू केली ?
a) लॉर्ड माऊंटबॅटन
b) लॉर्ड कॉर्नवॉलिस
c) लॉर्ड डलहौसी
d) लॉर्ड मिंटो

21. महालवारी पद्धतीमध्ये शेतसारा _____ वसूल केला जाई.
a) प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडून
b) गाव समूहाकडून
c) जमिनदारांमार्फत
d) मध्यस्थांमार्फत

22. कंपनीला _____ च्या लढाईनंतर बंगालमध्ये दिवाणी अधिकार मिळाले.
a) प्लासी b) मुर्शिदाबाद
c) बक्सार d) कोलकाता

23. भारतीय दंडसंहिता या वर्षी बनविण्यात आली.
a) 1860 b) 1862
c) 1853 d) 1857

24. भारतात विधवा पुनर्विवाह कायदा _____ साली संमत करण्यात आला ?
a) 1829 b) 1848
c) 1856 d) 1857

25. _____ हे ब्राह्मो समाजाचे मुख्य वैशिष्ट्य होते.
a) एकेश्वरवाद
b) ख्रिश्चन धिर्माला पाठिंबा
c) प्राचीन रूढींचे समर्थन
d) मूर्तिपूजा

26. तत्त्वबोधिनी सभेची स्थापना खालीलपैकी कोणी केली ?
a) ईश्वरचंद्र विद्यासागर
b) राजा राममोहन रॉय
c) अक्षयकुमार दत्त
d) देवेंद्रनाथ टागोर

27. मराठीतील पहिले साप्ताहिक 'दर्पण' हे यांनी सुरू केले ?
a) शिवरामपंत परांजपे
b) बाळशास्त्री जांभेकर
c) विष्णुशास्त्री चिपळूणकर
d) गोपाळ गणेश आगरकर

28. गोपाळ हरि देशमुख (लोकहितवादी) यांनी त्यांची 'शतपत्रे' या दैनिकात प्रसिद्ध केली.
a) केसरी b) नवाकाळ
c) काळ d) प्रभाकर

29. 'विडो रिमॅरेज असोसिएशन' या विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन देणाऱ्या संस्थेची स्थापना कोणी केली ?
a) विष्णुशास्त्री पंडित
b) भाऊ दाजी लाड
c) जगन्नाथ शंकरपेठ
d) महात्मा फुले

30. पुढीलपैकी कोण कर्मठ विचारधारांचे प्रतिनिधी नाहीत ?
a) वॉरन हेस्टिंग b) एडमंड वर्क
c) मन्रो d) यापैकी नाही

31. 1857 च्या उठावाचे 'पहिले भारतीय स्वातंत्र्य युद्ध' म्हणून वर्णन कोणी केले होते ?
a) रोमेशचंद्र मुजुमदार
b) वि. दा. सावरकर
c) सुभाषचंद्र बोस
d) मौ. अबुल कलाम आझाद

32. योग्य जोड्या जुळवा.

अ) संन्याशांचा उठाव	1) बंगाल
ब) चुआरांचा उठाव	2) महाराष्ट्र
क) रामोशांचा उठाव	3) मिदनापूर बंगाल
ड) हो जमातीचा उठाव	4) बिहार व बंगाल

	अ	ब	क	ड
a)	1	2	3	4
b)	2	3	4	1
c)	4	3	2	1
d)	1	3	2	4

33. नानासाहेब पेशव्यांनी कोठून उठाव सूरू केला व नंतर त्यांनी कोठे पलायन केले ?
a) पुणे व कानपूर
b) पुणे व नेपाळ
c) झाशी व ब्रह्मदेश
d) कानपूर व नेपाळ

34. अयोग्य जोडी ओळखा
a) बेगम हज़रत महल - अयोध्या (अवध)
b) मौलवी अहमदुल्ला - फैज़ाबाद
c) तात्या टोपे - सातारा
d) झाशीची राणी - झाशी

35. सत्यशोधक समाजाची स्थापना महात्मा फुले यांनी ____ या साली केली.
a) 1867 b) 1873
c) 1885 d) 1875

36. ____ यांचा सार्वजनिक सभेच्या कार्यात व स्थापनेत सिंहाचा वाटा होता.
a) गणेश वासुदेव जोशी
b) न्या. रानडे
c) लोकमान्य टिळक
d) लोकहितवादी

37. आर्य समाजाची स्थापना -------- यांनी केली.
a) डॉ. आत्माराम पांडुरंग
b) पांडुरंग दादोबा
c) न्या. रानडे
d) दयानंद सरस्वती

38. रामकृष्ण मिशनची स्थापना कधी झाली ?
a) 1897 b) 1875
c) 1873 d) 1870

39. प्रार्थना समाजाच्या प्रचारासाठी कोणते वृत्तपत्र चालू केले ?
a) संवाद कौमुदी
b) सुबोध पत्रिका
c) समाचार चंद्रिका
d) यापैकी नाही

40. 1849 साली हिंदू बालिका विद्यालयाची स्थापना कोणी केली ?
a) दयानंद सरस्वती
b) महात्मा फुले
c) ॲनी बेझंट
d) ईश्वरचंद्र विद्यासागर

41. 'पॉवर्टी ॲण्ड द अनब्रिटिश रूल इन इंडिया' (Poverty and the unbritish Rule in India) हा ग्रंथ कोणी लिहिला ?
a) आर्. सी. दत्त
b) न्या. रानडे
c) दादाभाई नौरोजी
d) गोपाळ कृष्ण गोखले

42. योग्य पर्याय निवडा
a) बॉम्बे असोसिएशन, लॅण्डहोल्डर्स असोसिएशन, ईस्ट-इंडिया असोसिएशन
b) लॅण्डहोल्डर्स असोसिएशन, ईस्ट-इंडिया असोसिएशन, बॉम्बे असोसिएशन
c) लॅण्डहोल्डर्स असोसिएशन, बॉम्बे असोसिएशन, ईस्ट-इंडिया असोसिएशन
d) ईस्ट-इंडिया असोसिएशन, बॉम्बे असोसिएशन, लॅण्डहोल्डर्स असोसिएशन

43. सूरूवातीच्या काळात काँग्रेसचा भर खालील गोष्टींवर नव्हता.
i) सामाजिक प्रश्न व शेतकऱ्यांचे प्रश्न
ii) सरकारकडे अर्ज विनंत्या करणे
iii) हिंसेचा उपयोग करणे
iv) व्यापक राष्ट्रीय चळवळ ब्रिटिशांविरोधात उभी करणे
a) केवळ ii
b) i, ii आणि iii
c) i आणि iv
d) i, iii आणि iv

44. राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते ?
a) व्योमेशचंद्र बॅनर्जी
b) सुरेंद्रनाथ बॅनर्जी
c) अरविंद घोष
d) बारिंद्रकुमार घोष

45. लोकमान्य टिळकांनी कोणती वृत्तपत्रे सूरू केली ?
a) हिंदू पॅट्रियट, आनंद बझार पत्रिका
b) ट्रिब्यून व बंगाली
c) युगांतर व गदर
d) केसरी व मराठा

46. 'न्यू लॅम्प्स फॉर ओल्ड' या लेखात मवाळांवर टीका कोणत्या नेत्याने केली ?
a) अरविंद घोष
b) लाला लजपतराय
c) बिपिनचंद्र पाल
d) लोकमान्य टिळक

47. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी कोणत्या क्रांतिकारी संघटनेची स्थापना केली ?
a) अनुशीलन समिती
b) अभिनव भारत
c) गदर
d) हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन

48. मुस्लिम लीगची स्थापना कधी झाली ?
a) डिसेंबर 1906 b) डिसेंबर 1905
c) डिसेंबर 1910 d) डिसेंबर 1904

49. 1907 मध्ये स्टुटगार्ड येथे भरलेल्या 'इंटरनॅशनल सोशालिस्ट काँग्रेस' मध्ये भारताचे प्रतिनिधित्व कोणी केले ?
a) श्यामजी कृष्ण वर्मा
b) मॅडम भिकाजी कामा
c) पंडित नेहरू
d) डॉ. खानखोजे

50. 1920 नंतर भारतातील क्रांतिकारी चळवळीवर मुख्यत्वे कोणत्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला आपणास दिसून येतो ?
a) साम्यवाद b) नाझीवाद
c) फॅसिझम d) सांप्रदायवाद

51. 1095 मधील बंगालच्या फाळणीमागे मुख्य कारण हे होते -
a) प्रशासकीय सोय
b) हिंदू-मुसलमान एकी नष्ट करणे
c) क्रांतिकारी चळवळ दडपणे
d) महसूली उत्पन्न वाढवणे

52. मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ कोणत्या कायद्याने देण्यात आले ?
a) 1892 इंडिया काऊन्सिल ॲक्ट
b) 1919 भारत सरकार कायदा
c) 1909 इंडिया काऊन्सिल ॲक्ट
d) 1935 भारत सरकार कायदा

53. 1907 मध्ये कोणत्या अधिवेशनात काँग्रेसमधील जहाल व मवाळ गटात फूट पडली ?
a) पुणे b) नागपूर
c) लखनौ d) सुरत

54. गांधीजींचे राजकीय गुरू कोण होते ?
a) गोपाळ कृष्ण गोखले b) न्या. रानडे
c) दादाभाई नौरोजी d) फिरोजशहा मेहता

55. सत्याग्रहींसाठी गांधीजींनी आफ्रिकेत जी वसाहत स्थापन केली, ती वसाहत कोणत्या नावाने ओळखली जाते ?
a) गॉर्की फार्म b) टॉलस्टॉय फार्म
c) न्यू इंडिया फार्म d) लेनिन फार्म

56. योग्य पर्याय निवडा.
a) अहमदाबाद सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, चंपारण्य सत्याग्रह
b) खेडा सत्याग्रह, अहमदाबाद सत्याग्रह, चंपारण्य सत्याग्रह
c) चंपारण्य सत्याग्रह, खेडा सत्याग्रह, अहमदाबाद सत्याग्रह
d) चंपारण्य सत्याग्रह, अहमदाबाद सत्याग्रह, खेडा सत्याग्रह

57. खिलाफत चळवळ कोणत्या कारणासाठी सूरू करण्यात आली ?
a) मुस्लिमांना राजकीय हक्क मिळावेत म्हणून
b) तुर्कस्तानच्या सुलतानाची खलिफा म्हणून नियुक्ती व्हावी म्हणून
c) मुस्लिमांना आरक्षण मिळावे म्हणून
d) तुर्कस्थानला धर्मनिरपेक्ष राष्ट्र करावे म्हणून

58. स्वराज्य पक्षाच्या अध्यक्षपदी कोण होते ?
a) चित्तरंजन दास b) मोतिलाल नेहरू
c) म. गांधी d) लोकमान्य टिळक

59. बोल्शेविक क्रांती कोणत्या देशात झाली ?
a) भारत b) जर्मनी
c) अमेरिका d) रशिया

60. Communist Party of India च्या स्थापनेत पुढीलपैकी कोणाचा समावेश नाही ?
a) मानवेंद्रनाथ रॉय
b) अबानी मुखर्जी
c) महम्मद शरीफ
d) खान अब्दुल गफारखान

61. कोणत्या वर्षी गोलमेज परिषद नव्हती ?
a) 1930 b) 1931
c) 1933 d) 1932

62. पुणे करार कधी झाला ?
a) 1930 b) 1931
c) 1933 d) 1932

63. वैयक्तिक सत्याग्रहातील दुसरे सत्याग्रही ?
a) विनोबा भावे b) पंडित नेहरू
c) गांधीजी d) ब्रह्मदत्त शर्मा

64. 'इंडिया विन्स फ्रीडम' ग्रंथ कोणाचा आहे ?
a) मौलाना आझाद b) म. गांधी
c) जीना d) लो. टिळक

65. 1965 च्या हरिपुरा अधिवेशनाचे अध्यक्ष कोण ?
a) पं. नेहरू
b) सुभाषचंद्र बोस
c) राजेंद्रप्रसाद
d) मौ. आझाद

66. सिमला परिषद केव्हा झाली ?
a) 1942 b) 1947
c) 1945 d) 1943

67. आझाद हिंद सेनेचे राष्ट्रगीत कोणते होते ?
a) जन-गण-मन b) जय हिंद की सेना
c) चलो दिल्ली d) NOTA

68. खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात प्रतिसरकारांची स्थापना झाली ?
a) मिदनापूर b) बालासोर
c) सातारा d) वरीलपैकी सर्व

69. 'म्युनिटी ऑफ द इनोसंटस' हे पुस्तक कोणी लिहिले ?
a) बी. सी. दत्त b) आर. सी. दत्त
c) म. गांधी d) मौ. आझाद

70. माऊंटबॅटन योजना कोणत्या वर्षी घोषित झाली ?
a) 1946 b) 1945
c) 3 जून 1947 d) 1948

71. 'क्रिप्स योजनेला बुडत्या बँकेचा पुढील तारखेचा चेक' असे कोण म्हणाले ?
a) सुभाषचंद्र बोस b) मौलाना आझाद
c) पंडित नेहरू d) महात्मा गांधी

72. जालियनवाला बाग हत्याकांड चौकशीसाठी ब्रिटिश सरकारने कोणाच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली ?
a) डायर b) आयर्विन
c) हंटर d) सायमन

73. द. आफ्रिकेतून गांधीजी भारतात कधी आले ?
a) 1914 b) 1920
c) 1910 d) 1911

74. खेडा सत्याग्रह कशाशी संबंधित होता ?
a) नीळ उत्पादन
b) गिरणी कामगार
c) दुष्काळग्रस्त शेतकरी
d) यापैकी नाही

75. वासुदेव चाफेकरांनी कोणाची हत्या केली ?
a) रँड b) आयर्स्ट
c) साँडर्स d) द्रविड बंधू

76. 'जर देवाने अस्पृश्यतेस मानण्यास सांगितले, तर मी त्यास देव मानणे सोडून देईन', असे कोण म्हणाले ?
a) लो. टिळक
b) म. गांधी
c) सावरकर
d) नेहरू

77. काँग्रेसची स्थापना केव्हा झाली ?
a) 1984 b) 1884
c) 1886 d) 1885

78. लखनौ करार कधी झाला ?
a) 1915 b) 1920
c) 1916 d) 1910

79. बंगालची फाळणी रद्द केव्हा झाली ?
a) 1908 b) 1911
c) 1915 d) 1913

80. 'मुस्लिम ही माझी आवडती पत्नी आहे.' हे उद्‌गार कोणाचे ?
a) ले. गव्हर्नर फुल्लर
b) डलहौसी
c) कॅनिंग
d) कर्झन

SECTION - B (गुण : 40)

या विभागात एकूण 40 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 40 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. पंजाबमधील ब्रिटिशविरोधी कुका चळवळीचे नेतृत्व कोणी केले ?

2. वासुदेव बळवंत फडके यांचा जन्म कुठे झाला ?

3. वासुदेव बळवंत फडके यांना पकडण्यासाठी ब्रिटिशांनी कोणाची नेमणूक केली ?

4. आझाद हिंद सेनेची स्थापना कोणी केली ?

5. नाशिक खटल्यामुळे कोणत्या संघटनेचे कार्य कमी झाले ?

6. सशस्त्र क्रांतीचा प्रसार करण्यासाठी अनुशिलन समितीने कोणत्या माध्यमांचा वापर केला ?

7. 1911 साली बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा कोणी केली ?

8. 1912 मध्ये रासबिहारी बोस यांनी कोणाच्या गाडीवर बॉम्ब हल्ला केला होता ?

9. भारतातील क्रांतिकारक परदेशात का गेले ?

10. 'वंदे मातरम्' हे पत्र पॅरिसमध्ये कोणी सुरू केले ?

11. 'गदर' नावाचे साप्ताहिक कोणत्या संघटनेमार्फत चालविले जात होते ?

12. चितगाव कट या योजनेचे मुख्य उद्दिष्ट काय होते ?

13. रँडच्या वधाला 'अफजलखानाच्या वधाची' उपमा कोणी दिली ?

14. हिंदी असोसिएशन ऑफ अमेरिका नावाची संघटना कोणी सुरू केली ?

15. काकोरी छाप्यामध्ये कोणाचा प्रमुख सहभाग होता ?

16. 'मुस्लिम ही माझी आवडती पत्नी आहे.' असे उद्‌गार कोणी काढले ?

17. 'भारतीय प्रबोधनाचे प्रणेते' असे कोणाला म्हटले जाते ?

18. सत्यशोधक समाजाचे ब्रीदवाक्य काय ?

19. 'वेदांकडून परत चला' अशी घोषणा कोणी दिली ?

20. 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ कोणी लिहिला ?

21. स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मठाचे नवीन नाव काय ठेवले ?

22. 'न्यू लॅम्पस फॉर ओल्ड' कोणी लिहिले ?

23. 'आनंदमठ' ही कादंबरी कोणी लिहिली ?

24. Drain Theory कोणी मांडली ?

25. टिळकांच्या चतुःसूत्रीमध्ये कशाचा समावेश होता ?

26. 'लखनौ करारा'चे महत्त्व काय आहे ?

27. होमरूल लीग सप्टेंबर 1916 मध्ये कोणी सुरू केली ?

28. महात्मा गांधींचे राजकीय गुरू कोणाला मानले जाते ?

29. महात्मा गांधी द. आफ्रिकेत सत्याग्रहींसाठी सुरू केलेल्या वसाहतीचे नाव काय ?

30. खिलाफत कमिटीची स्थापना कोणाच्या नेतृत्त्वाखाली करण्यात आली ?

31. भारतातील पहिले साम्यवादी नियतकालिक कोणते ? कोणी सुरू केले ?

32. कोणत्या सत्याग्रह लढ्यात वल्लभभाई पटेलांना 'सरदार' ही पदवी शेतकऱ्यांनी बहाल केली ?

33. जालियनवाला बाग हत्याकांडाच्या चौकशीसाठी ब्रिटिश सरकारने कोणाच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली ?

34. स्वराज्य पक्षाची स्थापना कोणी केली ?

35. 'नेहरू अहवाल' कोणाच्या अध्यक्षतेखाली तयार झाला ?

36. सरहद्द गांधी म्हणून कोणाला ओळखण्यात येते ?

37. मणिपूर येथे सविनय कायदेभंग चळवळीत कोणी सहभाग घेतला ?

38. पुणे करार कधी व कोणामध्ये झाला ?

39. 'म्युनिटी ऑफ द इनोसंटस' हे पुस्तक कोणी लिहिले ?

40. आझाद हिंद सेनेतील महिला पथकाच्या प्रमुख कोण होत्या ?

